**आजचे पंचांग**

दिनांक : ३ सप्टेंबर २०२६ वार : गुरुवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : भाद्रपद ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : सप्तमी तिथी (४ सप्टेंबर पहाटे ०२:२५ पर्यंत) त्यानंतर अष्टमी तिथी नक्षत्र : कृत्तिका नक्षत्र (४ सप्टेंबर रात्री १२:२८ पर्यंत) त्यानंतर रोहिणी नक्षत्र योग : व्याघात योग (सायंकाळी ०६:३२ पर्यंत) त्यानंतर हर्षण योग करण : विस्ती भद्रा करण (दुपारी ०३:२७ पर्यंत)

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

**बारामतीत पहाटे विविध विकासकामांची पाहणी**

**पुणे :** बारामती परिसरातील विकासकामांची पाहणी करताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी शुक्रवारी सकाळी प्रत्यक्ष दौरा करून कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला. जिल्हा क्रीडा संकुलाचे नाव यावेळी उंचावले गेले आणि त्यांनी विश्वास व्यक्त केला की, हे संकुल राज्यातील युवा खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. त्यांनी विकासकामे निर्धारित वेळेत, नियोजनबद्ध पद्धतीने आणि गुणवत्तापूर्णरीत्या पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकारी व यंत्रणांना दिल्या.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरूवार, दि. ३ सप्टेंबर २०२६ | वर्ष - १ | अंक - ३३६ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### ७ सप्टेंबरला बीड-पुणे रेल्वे; डिसेंबरमध्ये बीड-मुंबई सेवेसाठी धावपळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई / वृत्तसंस्था : मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून येत्या १७ सप्टेंबरपासून बीड-पुणे रेल्वे सेवा सुरू करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. या रेल्वेसाठी आवश्यक तांत्रिक आणि सुरक्षाविषयक चाचण्या पूर्ण झाल्याची माहिती उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली. तसेच डिसेंबरअखेर बीड-मुंबई (पनवेल) रेल्वे सेवा सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

सह्याद्री अतिथीगृह येथे अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. या बैठकीत उर्वरित तांत्रिक, प्रशासकीय आणि सुरक्षाविषयक प्रक्रिया १७ सप्टेंबरपूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

बीड-पुणे रेल्वेमुळे बीड जिल्ह्याची पुणे आणि पश्चिम महाराष्ट्राशी थेट रेल्वे जोडणी अधिक सक्षम होणार आहे. त्यामुळे कृषी, उद्योग, शिक्षण, व्यापार आणि सामाजिक क्षेत्राला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. नागरिकांचा प्रवासाचा वेळ आणि खर्चही कमी होण्यास मदत होणार आहे.

गतवर्षी १७ सप्टेंबर २०२५ रोजी बीड-अहिल्यानगर रेल्वे सेवा सुरू झाली होती. आता त्याच ऐतिहासिक दिनी बीड-पुणे रेल्वे सुरू करण्याचे नियोजन आहे. डिसेंबरअखेर बीड-मुंबई सेवा सुरू करण्यासाठी कालबद्ध आराखडा तयार करून कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

बीड-पुणे आणि बीड-मुंबई रेल्वे जोडणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

# महिलांच्या हक्कांसाठीही न्यायालयानेच धाव घ्यायची? सरकारचे ‘राजकारण’ कुठे संपते आणि जबाबदारी कुठे सुरू होते?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली / वृत्तसंस्था

प्रसूती रजेवर गेल्यामुळे एखाद्या महिलेला पद, अधिकार किंवा पदोन्नतीपासून वंचित ठेवता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण संदेश दिल्ली उच्च न्यायालयाने दिला आहे. मातृत्वामुळे महिलेला व्यावसायिक नुकसान सहन करावे लागू नये, यासाठी केंद्र सरकारने सहा महिन्यांत मार्गदर्शक तत्त्वे तयार करावीत, असे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत. निर्णय स्वागतार्ह आहे; पण त्यापेक्षा मोठा प्रश्न या निर्णयातून समोर येतो महिलांच्या मूलभूत हक्कांसाठी प्रत्येक वेळी न्यायालयानेच हस्तक्षेप का करावा लागतो?

महिलांच्या प्रश्नांवर सरकारकडून कायदे, योजना आणि घोषणा कमी नाहीत. महिला सक्षमीकरणाचे भाषण प्रत्येक राजकीय व्यासपीठावर ऐकायला मिळते. पण प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी एखाद्या महिलेचे मातृत्व तिच्या करिअरमध्ये अडथळा बनत असेल, तर त्यासाठी स्पष्ट आणि प्रभावी संरक्षण यंत्रणा आधीच का उभी राहू शकली नाही?

हा प्रश्न केवळ एका महिलेचा नाही. प्रसूती रजेवरून परतल्यानंतर एखाद्या कर्मचाऱ्याला कमी जबाबदारीचे काम देणे, अधिकार काढून घेणे किंवा अप्रत्यक्षपणे पदावनती करणे हा प्रकार किती ठिकाणी घडतो, याचा सरकारने कधी व्यापक आढावा घेतला आहे का? महिलांच्या कामगिरीचे मूल्यमापन करताना मातृत्वामुळे होणारा ‘करिअर पेनल्टी’ रोखण्यासाठी देशव्यापी स्पष्ट नियम का नसावेत?



ज्या प्रकरणात हस्तक्षेप केला, त्यात प्रसूती रजेवर गेलेल्या महिला कर्मचाऱ्याला परतल्यानंतर तिच्या पूर्वीच्या जबाबदाऱ्यांपेक्षा कनिष्ठ स्वरूपाचे काम देण्यात आले. कंपनीने पगार आणि ज्येष्ठता कायम असल्याचा युक्तिवाद केला. मात्र न्यायालयाने केवळ पगार पुरेसा नसल्याचे स्पष्ट केले. पदासोबत अधिकार, जबाबदारी, प्रतिष्ठा आणि कामाचे स्वरूपही सुरक्षित असले पाहिजे, हा संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे.

पण मग सरकारची भूमिका काय? प्रत्येक वेळी एखादी महिला अन्यायाविरुद्ध न्यायालयात गेल्यानंतरच धोरणात्मक त्रुटी का उघड व्हाव्यात? महिलांच्या संरक्षणासाठी कायद्यात पोकळी असेल, तर ती भरून काढण्यासाठी सरकारला न्यायालयाची सूचना लागते का?

राजकीय पक्ष महिलांना मतदार म्हणून पाहताना त्यांच्या प्रश्नांवर मोठमोठी आश्वासने देतात. मात्र महिला कर्मचारी, कामगार, व्यावसायिक आणि मातांच्या रोजच्या प्रश्नांना राजकीय प्राधान्यक्रमात किती जागा आहे? हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.

न्यायालयाने दिशा दाखवली आहे. आता सरकारने ती दिशा कायद्यात आणि धोरणात उतरवणे अपेक्षित आहे. तक्रार निवारण, पदाचे संरक्षण, पदोन्नतीतील समानता, क्रेच सुविधा आणि मातृत्वामुळे होणाऱ्या अप्रत्यक्ष भेदभावावर नियंत्रण हे केवळ न्यायालयीन आदेशांचे विषय न राहता सरकारी धोरणाचा भाग झाले पाहिजेत.

महिलांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी न्यायालयाने प्रत्येक वेळी घंटा वाजवण्याची गरज का पडावी? सरकारने न्यायालयाच्या हस्तक्षेपाची वाट पाहण्याऐवजी महिलांच्या प्रश्नांवर स्वतःहून कायदेशीर आणि प्रशासकीय उपाययोजना करण्याची वेळ आता आली आहे.

कारण महिलांना न्याय मिळण्यासाठी प्रत्येक वेळी कोर्टात जावे लागणे, हे न्यायव्यवस्थेचे यश असले तरी शासनव्यवस्थेचे अपयश ठरू नये का?

## ‘खटला कधी संपणार?’ ७ वर्षांहून अधिक तुरुंगवासानंतर गडलिंगांचा जामीन सर्वोच्च न्यायालयाच्या दारात!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली / प्रतिनिधी

भीमा कोरेगाव-एल्गार परिषद प्रकरणातील आरोपी आणि वकील-सामाजिक कार्यकर्ते सुरेंद्र गडलिंग यांच्या जामीन अर्जावर सर्वोच्च न्यायालय १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सुनावणी घेणार आहे. १ सप्टेंबर रोजी न्यायमूर्ती विक्रम नाथ, ऑगस्टीन जॉर्ज मसीह आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठाने ही तारीख निश्चित केली. गडलिंग यांच्यावरील प्रकरण, दीर्घकाळचा तुरुंगवास आणि यापूर्वी त्यांना मिळालेला जामीन यामुळे या सुनावणीकडे विशेष लक्ष लागले आहे.

सध्याचा जामीन अर्ज २०१६ मधील सुरजागड लोखंड धातू खाण आगीच्या प्रकरणाशी संबंधित आहे. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड खाणीतून लोखंड धातू वाहून नेणाऱ्या अनेक वाहनांना बंदी घातलेल्या भारतीय कम्युनिस्ट पक्ष (माओवादी) शी संबंधित व्यक्तींनी आग लावल्याचा आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे.

गडलिंग यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडली. त्यांनी न्यायालयाचे लक्ष वेधताना, गडलिंग सात वर्षांहून अधिक काळ तुरुंगात असल्याचे सांगितले. याशिवाय ते एल्गार परिषद-माओवादी संबंधांच्या प्रकरणातही आरोपी होते आणि त्या प्रकरणात त्यांना यापूर्वीच जामीन मंजूर झाल्याचा मुद्दाही सिब्बल यांनी मांडला.

या प्रकरणात आता मूलभूत प्रश्न असा आहे की एखाद्या आरोपीला न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी इतक्या प्रदीर्घ काळ तुरुंगात ठेवणे कितपत योग्य आहे? जामीन हा दोषमुक्तीचा निर्णय नसतो; अंतिम खटला आणि दोष सिद्ध होणे ही स्वतंत्र न्यायालयीन प्रक्रिया आहे. त्यामुळे दीर्घकाळ तुरुंगवास, खटल्याची प्रगती आणि आरोपीविरुद्ध उपलब्ध पुरावे यांचा समतोल साधण्याची जबाबदारी न्यायालयासमोर आहे.

दुसरीकडे, सुरजागड प्रकरणातील आरोप गंभीर असून, हिंसाचार आणि सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीशी संबंधित आरोपांची न्यायालयीन तपासणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे १४ ऑक्टोबरची सुनावणी केवळ गडलिंग यांच्या जामिनापुरती मर्यादित नसून, दीर्घकाळ प्रलंबित गंभीर गुन्ह्यांमध्ये जामीन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या तत्त्वांची कसोटी ठरणार आहे. आता प्रश्न एकचसात वर्षांहून अधिक तुरुंगवासानंतर सर्वोच्च न्यायालय गडलिंग यांना जामीन देणार, की गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर कारावास कायम ठेवणार? याचे उत्तर १४ ऑक्टोबरला मिळणार आहे.

## विकासाच्या नावाने समुद्राशी खेळ; मुंबई-कोलकात्याला धोका, तरी पर्यावरण कायदे कागदावरच?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

दिल्ली / वृत्तसंस्था

समुद्राची वाढती पातळी, वितळणाऱ्या हिमनद्या आणि वाढते महासागर तापमान यामुळे जगासमोर उभे राहिलेले संकट आता भविष्यातील इशारा राहिलेला नाही. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालाने मुंबई, कोलकाता आणि दक्षिण आशियातील सखल किनारी भागांतील लाखो लोकांच्या भवितव्याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. पण या धोक्याच्या पार्श्वभूमीवर भारतातील विकासाचे मॉडेल किती पर्यावरणस्नेही आहे, हा प्रश्न सरकारला विचारावाच लागेल.

रस्ते, पूल, महामार्ग, बंदरे, औद्योगिक प्रकल्प आणि शहरी विस्तार यांना ‘विकास’ म्हणताना पर्यावरणीय परिणामांचा विचार किती गांभीर्याने केला जातो? पर्यावरणीय मंजुरी ही शाश्वत विकासाची सुरक्षा-कवच असायला हवी; मात्र अनेकदा ती केवळ प्रकल्पाच्या वाटेतील प्रशासकीय अडथळा म्हणून पाहिली जाते, अशी टीका होत असते. मग समुद्राची पातळी वाढत असताना किनारपट्टीवरील अनियंत्रित बांधकामांकडे किती काळ दुर्लक्ष करायचे?

२०१४ ते २०२३ दरम्यान जागतिक समुद्रसपाटी दरवर्षी सरासरी ४.७ मिमीने वाढली, तर २०२४ मध्ये वाढीचा वेग ५.९ मिमीपर्यंत पोहोचल्याचे अहवालात नमूद आहे. ही आकडेवारी केवळ वैज्ञानिक अहवालातील संख्या नाही. त्यामागे शहरांचे पाणी, नागरिकांचे घर, शेती, उद्योग आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे.

मग प्रश्न असा आजच्या विकासासाठी उद्याच्या पिढीचे सुरक्षित पर्यावरण गहाण ठेवण्याचा अधिकार सरकारला कोणी दिला?

मुंबईसारख्या महानगरात समुद्रकिनारी वाढणारे बांधकाम, खारफुटीवरील दबाव, नद्यांचे आणि नैसर्गिक नाल्यांचे बदलते स्वरूप याकडे गांभीर्याने पाहिले जात आहे का? पर्यावरणीय नियम कडक केले तर विकास थांबेल, की विकासाचा मार्ग अधिक सुरक्षित होईल?

सरकारे हवामान बदलावर परिषदांमध्ये भाषणे करतात; पण प्रत्यक्ष धोरणांमध्ये पर्यावरणाला किती प्राधान्य मिळते? आपत्ती आल्यानंतर नुकसानभरपाई देण्यापेक्षा आपत्ती टाळण्यासाठी पर्यावरणीय कायद्यांची कठोर अंमलबजावणी करणे अधिक शहाणपणाचे नाही का?

समुद्राची पातळी वाढणे थांबवणे एका देशाच्या हातात नाही. पण किनारपट्टीचे संरक्षण, खारफुटी संवर्धन, अनियंत्रित बांधकामावर नियंत्रण आणि वैज्ञानिक नियोजन हे सरकारच्या हातात नक्कीच आहे.

## ओबीसींचा निधी अडतोय कुठे? बावनकुळेंचा अधिकाऱ्यांना दम, मग फडणवीसांच्या वित्त विभागाला जाब कधी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई / प्रतिनिधी :

ओबीसींसाठी अर्थसंकल्पात मंजूर झालेला निधी तातडीने ओबीसी विभागाला द्यावा, अशी तंबी महसूलमंत्री आणि ओबीसी मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना दिली. निधी देण्याचे कायदेशीर बंधन असतानाही वेळकाढूपणा होत असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. मात्र या भूमिकेमुळे एक साधा पण महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतोजर निधी वित्त विभागाकडून मिळायचा असेल, तर अधिकाऱ्यांना दम देण्याऐवजी वित्त विभागाच्या प्रमुखांकडे थेट जाब का मागितला जात नाही?

विशेष म्हणजे राज्याच्या अर्थकारभाराची जबाबदारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे. त्यामुळे अर्थसंकल्पात निधी मंजूर झाल्यानंतर तो संबंधित विभागाला वितरित करण्यात अडथळा नेमका कुठे येतो, याचा थेट खुलासा वित्त विभागाकडून होणे अपेक्षित नाही का?

ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती, वसतिगृहांसाठी जागा, महामंडळांचे सक्षमीकरण, महाज्योतीची प्रलंबित देणी आणि विविध योजनांसाठी निधीची आवश्यकता असल्याचे बैठकीत स्पष्ट झाले. महाज्योतीला ३०० कोटी रुपये देण्यात आले असले तरी संस्थेने एक हजार कोटींची मागणी केली आहे. तब्बल १२५ कोटी रुपयांची बिले प्रलंबित असल्याचे सांगितले जात आहे, तर पीएचडी फेलोशिपचे १२६ कोटी रुपयांचे दायित्वही बाकी आहे.

मग प्रश्न असाअर्थसंकल्पात निधीची तरतूद होते, विभागांकडून मागणी होते, उपसमिती बैठका घेते, अधिकारी निर्देश घेतात; तरी पैसा प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचायला इतका वेळ का लागतो?

बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारणे चुकीचे नाही. प्रशासनातील विलंबाबाबत जबाबदारी निश्चित झालीच पाहिजे. पण त्याचवेळी निधी वितरणाची अंतिम प्रक्रिया कुठे अडकली आहे, हेही स्पष्ट व्हायला नको का? जर वित्त विभागाकडे निधी वितरणाचा अधिकार आणि जबाबदारी असेल, तर त्या विभागाच्या पातळीवर निर्णय घेण्यासाठी कोणती अडचण आहे? सरकार एका बाजूला ओबीसी समाजाच्या योजनांसाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगते आणि दुसऱ्या बाजूला मंजूर निधीच्या वितरणासाठी वारंवार आढावा बैठका घ्याव्या लागतात, ही विसंगती नाही का? महाज्योतीला ३०० कोटी देऊनही अभ्यासक्रम बंद पडत असतील, तर मागणी आणि प्रत्यक्ष निधी यातील तफावत कशी निर्माण झाली? संस्थेने एक हजार कोटींची मागणी का केली? ३०० कोटींचे वाटप करताना आगामी गरजांचा अंदाज घेतला गेला होता का? १२५ कोटींची बिले प्रलंबित राहण्यामागे नेमकी कोणती प्रशासकीय प्रक्रिया आहे? या प्रश्नांची उत्तरे केवळ अधिकाऱ्यांकडून मागून भागेल का?

ओबीसी समाजासाठी निधी हा केवळ अर्थसंकल्पातील आकडा नाही; तो विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी, फेलोशिपशी, रोजगाराच्या संधींशी आणि सामाजिक विकासाशी जोडलेला आहे. त्यामुळे ‘निधी मंजूर’ आणि ‘निधी उपलब्ध’ यातील अंतर किती काळ ठेवणार? हा प्रश्न अधिक गंभीर आहे.

## राम मंदिर ट्रस्टच्या सीईओपदासाठी जितेंद्र मिश्रा हेच का? निवडीच्या निकषांवर प्रश्नचिन्ह!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

अयोध्या / वृत्तसंस्था

श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या पहिल्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी (सीईओ) भारतीय वायुसेनेचे निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय वायुसेनेच्या पश्चिम कमांडचे नेतृत्व, ‘ऑपरेशन सिंदूर’च्या काळातील जबाबदारी आणि संरक्षण क्षेत्रातील दीर्घ अनुभव पाहता त्यांच्या नियुक्तीकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. मात्र, या नियुक्तीमुळे एका वेगळ्याच मुद्द्याची चर्चा सुरू झाली आहेराम मंदिर ट्रस्टच्या सीईओपदासाठी जितेंद्र मिश्रा यांचीच निवड का करण्यात आली?

हा प्रश्न त्यांच्या क्षमतेवर शंका घेण्यासाठी नाही. उलट, त्यांच्या अनुभवाचा विचार केला तर ते निश्चितच सक्षम अधिकारी राहिले आहेत. पण एखाद्या महत्त्वाच्या पदासाठी व्यक्तीची निवड होत असताना निवडीचे निकष काय होते, हे जाणून घेण्याचा अधिकार समाजाला नाही का?

या पदासाठी अन्य प्रशासकीय अधिकारी, निवृत्त सनदी अधिकारी, व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञ किंवा धार्मिक संस्थांच्या प्रशासनाचा अनुभव असलेल्या व्यक्तींचाही विचार करण्यात आला होता का? केला असेल, तर त्यातून मिश्रा यांची निवड कोणत्या निकषांवर झाली? आणि जर निवड प्रक्रियेत अनेक पर्याय होते, तर अंतिम निर्णयामागील कारणे सार्वजनिक करण्यास काय हरकत आहे? राम मंदिर आज केवळ धार्मिक श्रद्धेचे केंद्र राहिलेले नाही. देशभरातून मोठ्या संख्येने भाविक येथे येत आहेत. मंदिराशी संबंधित प्रशासन, देणग्यांचे व्यवस्थापन, भाविकांची सुविधा, सुरक्षा, पायाभूत सुविधा, कर्मचारी व्यवस्थापन आणि भविष्यातील विस्तार अशा अनेक जबाबदाऱ्या वाढत आहेत. अशा परिस्थितीत सीईओपदासाठी लष्करी नेतृत्वाचा अनुभव हा प्रमुख निकष होता का? की प्रशासकीय आणि व्यवस्थापन कौशल्यालाही समान महत्त्व देण्यात आले?

याहून महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, या नियुक्तीत सामाजिक आणि संस्थात्मक विविधतेचा विचार करण्यात आला का? देशातील विविध समाजघटकांमधून सक्षम व्यक्ती उपलब्ध असताना निवडीची प्रक्रिया किती व्यापक होती? एका विशिष्ट प्रकारच्या पार्श्वभूमीतील अधिकाऱ्यांनाच अशा महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांसाठी प्राधान्य दिले जाते आहे का, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक नाही का?

मोदी सरकारवर थेट आरोप करण्यापेक्षा सरकारनेच या प्रश्नांची उत्तरे देणे अधिक योग्य ठरेल. कारण पारदर्शक नियुक्ती प्रक्रिया असेल, तर तिचे निकष सांगण्यात अडचण काय असावी? आणि जर मिश्रा यांची निवड सर्वाधिक योग्य ठरली असेल, तर त्यांच्या निवडीमागील प्रशासकीय, व्यवस्थापनात्मक आणि संस्थात्मक कारणे जनतेसमोर मांडली जाऊ शकतात का?

राम मंदिर ट्रस्ट ही श्रद्धेशी जोडलेली संस्था आहे. त्यामुळे तिच्या प्रशासनात पारदर्शकता, विश्वासार्हता आणि व्यापक प्रतिनिधित्व यांना विशेष महत्त्व असायला नको का? मंदिराच्या व्यवस्थापनासाठी निवडला जाणारा पहिला सीईओ भविष्यातील प्रशासकीय चौकटीचा चेहरा ठरणार असेल, तर त्यांची निवड नेमक्या कोणत्या प्रक्रियेतून झाली, हे स्पष्ट होणे आवश्यक नाही का?

जितेंद्र मिश्रा सक्षम आहेत की नाही, हा एक प्रश्न आहे; पण त्याहून मोठा प्रश्न आहेत्यांच्यापेक्षा इतर कोणते पर्याय विचारात घेतले गेले आणि त्यांना का निवडले गेले नाही?

आणखी एक प्रश्नही अनुत्तरित राहतो देशातील महत्त्वाच्या धार्मिक-सार्वजनिक संस्थांच्या नियुक्त्यांमध्ये ‘योग्यता’सोबत विविधतेलाही समान स्थान दिले जात आहे का?

या प्रश्नांची उत्तरे मिळाली तर चर्चेला दिशा मिळेल. अन्यथा प्रत्येक महत्त्वाच्या नियुक्तीनंतर ‘निवड नेमकी कशी झाली?’ हा प्रश्न पुन्हा पुन्हा उपस्थित होत राहणार आहे.

## संपादकीय

### ७.८ टक्के जीडीपीचा जल्लोष पण गावाच्या अर्थव्यवस्थेचे काय?

उत्पादन क्षेत्र ९.२ टक्क्यांनी वाढते, वित्तीय आणि रिअल इस्टेट सेवा १२.१ टक्क्यांनी वाढतात; पण शेतीची वाढ केवळ ३.६ टक्के राहते. हा केवळ दोन आकड्यांमधला फरक नाही; हा भारताच्या विकासाच्या दिशेवरचा गंभीर प्रश्न आहे.

कारण भारताची खरी आर्थिक परीक्षा मुंबईच्या शेअर बाजारात किंवा दिल्लीतील वातानुकूलित परिषदांमध्ये होत नाही. ती गावाच्या बाजारपेठेत होते. शेतकऱ्याच्या शेतात होते. कृषी मजुराच्या हाताला काम मिळते की नाही, यामध्ये होते. दूध, भाजीपाला, धान्य, कापूस, ऊस किंवा सोयाबीन विकल्यानंतर कुटुंबाच्या हातात प्रत्यक्ष किती पैसा उरतो, यात होते.

सरकार ७.८ टक्के जीडीपीची आकडेवारी दाखवते. पण ग्रामीण भारताला प्रश्न पडतो माझ्या उत्पन्नाचा वेग किती?

शेतीची वाढ ३.६ टक्के आणि महागाईत अन्नपदार्थांचा दबाव कायम असेल, तर शेतकऱ्याच्या उत्पन्नाची वास्तविक क्रयशक्ती किती वाढली, याचे उत्तर द्यावे लागेल. उत्पादन खर्च वाढत असेल, बियाणे, खते, औषधे, डिझेल, वीज आणि मजुरीचा खर्च वाढत असेल आणि त्याच वेळी शेतमालाला अपेक्षित भाव मिळत नसेल, तर जीडीपीचा मोठा आकडा शेतकऱ्याच्या घरापर्यंत पोहोचतो तरी कसा?

जीडीपी वाढीचा फायदा जर गावाच्या किराणा दुकानाच्या उलाढालीत, शेतकऱ्याच्या बचतीत आणि ग्रामीण कुटुंबाच्या खरेदीक्षमतेत दिसत नसेल, तर त्या वाढीचा सामाजिक अर्थ काय?

ग्रामीण अर्थव्यवस्था ही केवळ शेती नसते. शेतकऱ्याच्या हातात पैसा आला की गावातील ट्रॅक्टर दुरुस्तीचे दुकान चालते, कृषी सेवा केंद्र चालते, छोटा व्यापारी कमावतो, बांधकामाला काम मिळते, दुग्धव्यवसायाला चालना मिळते आणि स्थानिक बाजारपेठेत पैसा फिरतो. त्यामुळे शेतीची कमकुवत वाढ ही केवळ शेतकऱ्याची समस्या नसून संपूर्ण ग्रामीण मागणीची समस्या आहे.

याच ठिकाणी मोदी सरकारच्या आर्थिक मॉडेलला कठीण प्रश्न विचारावा लागतो.

मोठे महामार्ग उभे राहतात, मोठे उद्योग येतात, शहरांमध्ये मेट्रो धावतात, बंदरे आणि विमानतळ विस्तारतातहे विकासाचे आवश्यक भाग आहेत. पण त्याच वेळी गावातून शहराकडे रोजगारासाठी होणारे स्थलांतर वाढत असेल, ग्रामीण तरुणाला स्थानिक पातळीवर स्थिर रोजगार मिळत नसेल आणि शेतीवरचा आर्थिक ताण कायम असेल, तर विकासाचा लाभ भौगोलिकदृष्ट्याही असमान आहे, असे म्हणावे लागेल.

एक भारत एक्सप्रेसवेवर वेगाने धावत आहे; दुसरा भारत अजूनही पिकाच्या भावाची वाट पाहत आहे.

ही दरी कमी करण्याची जबाबदारी सरकारची आहे.

ग्रामीण भारताला केवळ अनुदान किंवा निवडणुकीपूर्वीच्या घोषणांची गरज नाही. त्याला स्थिर कृषी उत्पन्न, बाजारपेठेपर्यंत पोहोच, साठवणूक आणि प्रक्रिया उद्योग, ग्रामीण रोजगार, सिंचन, स्वस्त कर्ज आणि स्थानिक उद्योगांना बाजारपेठ हवी आहे. शेतकऱ्याला ग्राहक म्हणून नव्हे, अर्थव्यवस्थेचा उत्पादक आणि भागीदार म्हणून पाहण्याची गरज आहे.

कारण शहरातील जीडीपी वाढवणारी मागणी आणि गावातील खरेदीशक्ती यांचा संबंध तोडला गेला, तर अर्थव्यवस्थेची वाढ वरून चमकदार आणि खालून कमकुवत राहू शकते.

म्हणूनच ७.८ टक्के जीडीपीच्या जल्लोषात एक प्रश्न मुद्दाम विचारला पाहिजे

या ७.८ टक्क्यांत ग्रामीण भारताचा हिस्सा किती आहे?

आणि जर उत्तर केवळ शेतीच्या ३.६ टक्के वाढीत मिळणार असेल, तर सरकारने स्वतःलाच आणखी एक प्रश्न विचारला पाहिजे

भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढते आहे, की भारतातील काही क्षेत्रे वेगाने वाढत आहेत?

कारण शेतकरी मागे राहिला, ग्रामीण ग्राहकाची क्रयशक्ती दबली आणि गावातील तरुण रोजगारासाठी शहरांकडे धावत राहिला, तर जीडीपीचा वेग कितीही मोठा असला तरी विकासाची कहाणी अपूर्णच राहणार आहे.

भारताला फक्त मोठी अर्थव्यवस्था बनायचे नाही; भारतातील गावांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवायचे आहे.

आणि हीच ७.८ टक्के जीडीपीसमोरची सर्वात मोठी ग्रामीण कसोटी आहे.

# पीसीएमसी महासभेवरच कायदेशीर प्रश्नचिन्ह! भाजप म्हणते 'सभा वैध', राष्ट्रवादीचा सभात्याग; नियमांच्या गोंधळात महापालिकेचा कारभार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिकेची सप्टेंबर महिन्याची सर्वसाधारण सभा बुधवारी चांगलीच वादळी ठरली. महापालिकेची मासिक सर्वसाधारण सभा कायदेशीर पद्धतीने झाली की नियमांना बगल देऊन? या प्रश्नावर सत्ताधारी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. महापौर रवी लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली सभा पार पडली; मात्र कायदेशीर वैधतेवर आक्षेप घेत राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी सभात्याग केला.

राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नगरसेवक योगेश बहल यांनी सभेच्या सुरुवातीलाच प्रशासनाला धारेवर धरले. त्यांच्या म्हणण्यानुसार, नियमित सर्वसाधारण सभा घेण्यासाठी सात दिवसांची पूर्ण नोटीस देणे बंधनकारक असताना प्रत्यक्षात नोटीस दिल्यानंतर अवघ्या पाचव्या दिवशी सभा घेण्यात आली. त्यामुळे सभेची कायदेशीर वैधताच संशयाच्या भोवऱ्यात असल्याचा दावा त्यांनी केला.



याहून गंभीर आक्षेप ऑगस्ट महिन्याच्या तहकूब सभेतील विषयांबाबत उपस्थित करण्यात आला. ऑगस्टच्या तहकूब सभेतील एकूण ३१ विषयांपैकी निवडक १८ विषय सप्टेंबरच्या नियमित सर्वसाधारण सभेत घेण्यात आले. हे विषय नियमित सभेत घेण्याचा अधिकार कोणत्या कायद्याने किंवा नियमाने दिला आहे, असा सवाल बहल यांनी केला. तहकूब सभेतील विषय तहकूब सभेतच मंजूर करणे आवश्यक असल्याचा त्यांचा दावा होता.

महापालिकेच्या कायदा विभागाचे उपायुक्त राजेश आगळे यांनी प्रशासनाची बाजू मांडताना सात दिवसांची पूर्ण नोटीस आवश्यक असल्याचे मान्य केले; मात्र स्थायी समितीच्या सदस्यांच्या मागणीवरून होणाऱ्या विशेष सभेसाठी तीन दिवसांची नोटीस आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच तहकूब सभेतील विषय पुढील सभेत घेता येतील किंवा नाही, याबाबत महापालिका अधिनियमात स्पष्ट तरतूद नसल्याचे सांगत सप्टेंबरची सभा कायदेशीर पद्धतीने आयोजित करण्यात आल्याचा दावा केला.

मात्र राष्ट्रवादीने प्रशासनाचे हे स्पष्टीकरण फेटाळले. 'नियम स्पष्ट नसतील तर प्रशासनाला मनमानी करण्याचा अधिकार मिळतो का?' असा सवाल उपस्थित करत राष्ट्रवादी नगरसेवकांनी प्रशासनाचा निषेध केला आणि सभात्याग केला. दुसरीकडे सत्ताधारी भाजपने सभा वैध असल्याची भूमिका घेत कामकाज सुरू ठेवले.

आता राष्ट्रवादीने या प्रकरणी न्यायालयात दाद मागण्याचा इशारा दिल्याने महापालिकेच्या सभेतील राजकीय संघर्ष न्यायालयाच्या दारात जाण्याची शक्यता आहे. प्रश्न केवळ भाजप विरुद्ध राष्ट्रवादी एवढाच नाही; महापालिकेतील निर्णय कोणत्या नियमांनुसार घेतले जातात आणि नागरिकांच्या पैशांशी संबंधित ठरावांची प्रक्रिया कायदेशीर आहे की नाही, हा त्याहून मोठा प्रश्न आहे.

नियमांचा अर्थ सत्तेनुसार बदलणार असेल, तर महापालिकेचा कारभार पारदर्शक कसा राहणार? आता याचे उत्तर प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांना द्यावे लागणार आहे.

# ६ लाख मतदार 'गायब'!

## पिंपरी-चिंचवडच्या मतदार यादीवर एसआयआरचा घाला; मतदानाचा हक्क वाचवण्याची आता नागरिकांचीच परीक्षा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवडच्या मतदार यादीबाबत समोर आलेली आकडेवारी धक्कादायक आहे. विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात इखठ प्रक्रियेनंतर शहरातील तब्बल ६ लाख ८ हजार ९२७ मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. इखठपूर्वी पिंपरी-चिंचवडमधील चिंचवड, पिंपरी आणि भोसरी या तीन विधानसभा मतदारसंघांत मिळून १७ लाख २४ हजार ५३७ मतदार होते. आता प्रारूप यादीत केवळ ११ लाख १५ हजार ६१० मतदार उरले आहेत.

सर्वाधिक फटका चिंचवड मतदारसंघाला बसला आहे. येथे ६ लाख ८७ हजार ४४८ मतदारांपैकी २ लाख ७० हजार २३ नावे वगळली गेली असून आता ४ लाख १७ हजार ४२५ मतदार आहेत. पिंपरीत ४ लाख १ हजार १७५ पैकी १ लाख ६५ हजार ६९७, तर भोसरीत ६ लाख ३५ हजार ११४ पैकी १ लाख ७३ हजार २०७ मतदारांची नावे प्रारूप यादीत दिसत नाहीत.

निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार इखठमध्ये मृत, कायमस्वरूपी स्थलांतरित, अनुपस्थित किंवा दुबार नोंद असलेल्या मतदारांची छाननी केली जाते. मात्र, एखाद्या पात्र नागरिकाचे नाव चुकीने वगळले गेले असेल तर त्याने गप्प बसणे ही सर्वात मोठी चूक ठरेल. पुणे जिल्हा प्रशासनाने ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे आणि हरकती दाखल करण्याची संधी दिली आहे.

म्हणून प्रत्येक नागरिकाने आपले आणि कुटुंबातील प्रत्येक सदस्याचे नाव तातडीने तपासावे. नाव नसेल तर नमुना ६, चुकीची माहिती असल्यास नमुना ८ आणि संबंधित नोंदीबाबत आक्षेप असल्यास नमुना ७ वापरता येतो. दावे-हरकतींचा निपटारा २९ ऑक्टोबरपर्यंत, तर अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध होणार आहे.

# पीसीएमसी भरतीचा मोठा घोटाळा? १३ आरोग्य निरीक्षकांची नोकरी धोक्यात; शासनमान्यता नसलेल्या प्रमाणपत्रांवर महापालिकेने दिली नोकरी कशी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी : प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील आरोग्य निरीक्षकांच्या भरती प्रक्रियेवर आता गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शासनाची मान्यता नसलेल्या संस्थेच्या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र वापरून महापालिकेत नोकरी मिळवलेल्या १३ आरोग्य निरीक्षकांवर कारवाईची टांगती तलवार आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर महापालिका प्रशासनाने या प्रकरणाची खातेनिहाय चौकशी सुरू करण्याची तयारी केली आहे.

या प्रकरणाचा धक्कादायक भाग म्हणजे 'ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्न्मेंट' या संस्थेचा आरोग्य निरीक्षक अभ्यासक्रम शासनमान्य नसल्याचे समोर आले आहे. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाच्या माहितीनुसार या संस्थेविरोधात अनधिकृत संस्था म्हणून कारवाई सुरू होती. संस्थेला यापूर्वीच नोटीस देण्यात आली होती आणि ५ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या सुनावणीनंतर संस्थेला अनधिकृत ठरविण्याची प्रक्रिया पुढे गेली.

मात्र प्रश्न आता केवळ त्या संस्थेचा नाही; प्रश्न पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या भरती यंत्रणेचा आहे. शासनमान्यता नसलेल्या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र उमेदवारांच्या पात्रतेसाठी ग्राह्य धरले गेलेच कसे? त्या प्रमाणपत्रांची पडताळणी कोणी केली? नियुक्तीपूर्वी शैक्षणिक पात्रतेची तपासणी करणाऱ्या यंत्रणेने नेमके काय तपासले? आणि जर ही प्रमाणपत्रे ग्राह्य नव्हती, तर त्या आधारावर नियुक्त्या होईपर्यंत प्रशासनाला याची माहिती का झाली नाही?

या प्रकरणाची सुरुवात महापालिकेने ३० ऑगस्ट २०२४ रोजी आरोग्य निरीक्षक पदासाठी प्रसिद्ध केलेल्या भरती जाहिरातीपासून झाली. चेतन बोरसे या उमेदवाराने मराठवाडा विकास मंडळामार्फत आरोग्य निरीक्षकाचा एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केला होता. मात्र संबंधित अभ्यासक्रम अनधिकृत असल्याचे सांगत त्याला भरती प्रक्रियेतून बाद करण्यात आले. त्यानंतर बोरसे यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. या सुनावणीदरम्यान शासनाच्या बाजूने झालेल्या मांडणीत ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्न्मेंट ही संस्थादेखील अनधिकृत असल्याचे आणि तिच्याविरोधात २०१३च्या कायद्यानुसार कारवाई सुरू असल्याचे स्पष्ट झाले.

# पथनाट्यातून स्वच्छतेचा जागर; घरातूनच चार प्रकारे कचरा विलगीकरणाचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

कचरा विलगीकरण आणि योग्य व्यवस्थापनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या स्तरावर पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले. 'स्वच्छ सर्वेक्षण २०२६' आणि 'माझी वसुंधरा ७.०' अंतर्गत राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून नागरिकांना ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजी योग्य कचरा अशा चार प्रकारे कचरा विलगीकरण करण्याचा संदेश देण्यात आला.

पथनाट्याच्या माध्यमातून सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि कचरा निर्माण होतो त्याच ठिकाणी त्याचे योग्य विलगीकरण करणे याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमानंतर नागरिकांना स्वच्छता शपथही देण्यात आली.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाकडून कचरा विलगीकरणाबाबत विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. पथनाट्य, जनजागृती मोहीम आणि नागरिकांशी



प्रत्यक्ष संवादाच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश देण्यात येत आहे.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, शहर स्वच्छ ठेवण्यासाठी महापालिकेच्या यंत्रणेसोबत नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. कचरा निर्माण होण्याच्या ठिकाणीच त्याचे योग्य विलगीकरण झाल्यास कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करता येते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने कचरा विलगीकरणाची सवय अंगीकारावी.

उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनीही नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकण्याचे आवाहन केले. कचरा विलगीकरण हा प्रभावी कचरा व्यवस्थापनाचा पाया आहे. नागरिकांनी ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजी योग्य कचरा स्वतंत्रपणे द्यावा, असे त्यांनी सांगितले.

पथनाट्यात दैनंदिन जीवनातून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे योग्य विलगीकरण न केल्यास उद्भवणाऱ्या समस्या आणि कचरा व्यवस्थापनात नागरिकांची भूमिका प्रभावीपणे मांडण्यात आली. शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी नागरिकांनी कचरा विलगीकरणासह महापालिकेच्या स्वच्छता उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले.

# धक्कादायक! गहुंजे येथील उच्चभ्रू सोसायटीत विवाहितेचा सासरच्यांकडून विनयभंग; पतीकडून गळा आवळून जीवे मारण्याचा प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे / मावळ: : प्रतिनिधी

गहुंजे परिसरातील नामांकित 'लोढा बेलमोंडो' सोसायटीमध्ये घरगुती वादातून सुनेचा विनयभंग करत तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शिरगाव परंदवडी पोलीस ठाण्यात पती, सासरे आणि सासूविरोधात गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३९ वर्षीय फिर्यादी महिला व तिचे पती वैभव मेहतानी यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. यावेळी सासरे राजीव मेहतानी (वय ७०) यांनी वाद सोडवण्याच्या बहाण्याने सुनेला अंगावर ढकलून छातीला हात लावला. फिर्यादीने सुरुवातीला दुर्लक्ष केले असता, सासऱ्याने पुन्हा जाणूनबुजून छाती पकडून लज्जास्पद वर्तन केले. यानंतर पती वैभव याने पाठीमागून येऊन महिलेचे तोंड व मान पकडली, तर सासू अनिता मेहतानी (वय ६५) हिने तिचे केस ओढून धरले. "तुला आज जिवंत सोडणार नाही" अशी धमकी देत पतीने महिलेचा गळा आवळून तिला ठार मारण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीच्या आई-वडिलांनी सोडवण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही धक्काबुक्की करण्यात आली. शिरगाव पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

**भोसरी पोलिसांत तक्रार का केली?'**

**स्पाइन रोडवर तरुणावर धारदार शस्त्राने खुनी हल्ला; एकाला अटक**

भोसरी : पोलिसांत तक्रार केल्याच्या जुन्या रागातून एका तरुणाला रस्त्यात अडवून बेदम मारहाण करत धारदार शस्त्राने सपासप वार केल्याची थरारक घटना स्पाइन रोडवरील मोतेरे हाऊस चौकात घडली. याप्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलिसांनी मुख्य आरोपी नवनाथ उर्फ बबनराव घोलप (वय ३९, रा. इंद्रायणी नगर) याला बेड्या ठोकल्या आहेत. फिर्यादी आदित्य घुगे (वय २४, रा. मोशी) हे मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास मित्राला भेटून दुचाकीवरून घरी जात होते. मोतेरे हाऊस चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर आरोपी नवनाथ घोलप व त्याचे दोन अनोळखी साथीदार थांबले होते. त्यांनी फिर्यादीला रस्त्यात अडवून "माझ्याविरुद्ध भोसरी पोलीस ठाण्यात तक्रार का दिली?" असा जाब विचारत शिवीगाळ व मारहाण सुरू केली. वाद वाढत असतानाच आरोपी नवनाथ घोलप याने स्वतःजवळील धारदार शस्त्राने आदित्य यांच्या डाव्या हातावर जोरदार वार करून त्यांना गंभीर जखमी केले. पोलिसांनी आरोपी नवनाथ घोलपला अटक केली असून उर्वरित दोन फरार साथीदारांचा शोध सुरू आहे.

**सोन्याचा मुलामा दिलेले पितळेचे मणी विकून तरुणाला तब्बल १० लाखांचा गंडा; रावेत परिसरातील घटना**

रावेत: अर्धा किलो वजनाचे सोन्याचे मणी स्वस्तात देण्याचे आमिष दाखवून एका तरुणाला तब्बल १० लाख रुपयांना गंडवल्याचा प्रकार रावेत येथील बीआरटी रोडवर उघडकीस आला आहे. याप्रकरणी रावेत पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी राजू प्रजापती, त्याचा अंदाजे २५ ते २६ वर्षांचा भाचा आणि ४० वर्षीय बहीण यांनी तुकाराम शिवाजी राठोड (वय २७, रा. कर्नाटक) यांचा विश्वास संपादन केला. आरोपींनी तुकाराम यांना अर्धा किलो वजनाचे पितळेचे मणी दाखवून त्यावर सोन्याचे पाणी चढवले असल्याचे भासवले. हे अस्सल सोन्याचे दागिने असल्याचे सांगून त्यांच्याकडून रोख १० लाख रुपये उकळले. हा व्यवहार कोहिनूर बिल्डिंगच्या विरुद्ध बाजूस मुकाई चौकाजवळील बीआरटी रोडच्या फुटपाथवर पार पडला. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच राठोड यांनी पोलिसांत धाव घेतली.

**वृद्धेचा विश्वास संपादन करून मंगळसूत्र लंपास; दिघीमध्ये भामट्या महिलांचा प्रताप**

दिघी: कमलराज सोसायटीकडून महादेव नगरकडे पायी जात असलेल्या एका ६५ वर्षीय वृद्ध महिलेला बोलण्यात गुंतवून गळ्यातील दीड तोळ्याचे सोन्याचे मणी-मंगळसूत्र लंपास केल्याची घटना दिघी येथे घडली.

गुनाबाई नथु ढवडे (वय ६५) या ममता चौकातून जात असताना दोन अज्ञात महिलांनी त्यांना थांबवले. विचारपूस करण्याच्या बहाण्याने विश्वास संपादन करत, या भामट्या महिलांनी फिर्यादीच्या गळ्यातील दीड तोळ्याचे सोन्याचे मणी असलेले मंगळसूत्र शिताफीने काढून घेतले. त्यानंतर वृद्धेच्या पिशवीत कापडात बांधून खोटे मणी ठेवून त्यांची फसवणूक केली. याप्रकरणी मुलगा अविनाश ढवडे यांच्या फिर्यादीवरून दिघी पोलिसांनी दोन अज्ञात महिलांविरोधात गुन्हा दाखल केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### लांडेवाडीत घरफोडी; दीड लाखांचा ऐवज लंपास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील लांडेवाडी येथे अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत सोन्या-चांदीचे दागिने व चांदीची मूर्ती असा सुमारे १ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. ही घटना २३ ऑगस्ट ते १ सप्टेंबरदरम्यान घडली.

याप्रकरणी कमल बाळू काळे यांनी मंचर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, लांडेवाडी येथील त्यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्याने घरात प्रवेश केला. त्यानंतर कपाटातून सुमारे ६० हजार रुपये किमतीची सोन्याची चैन, ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनी मंगळसूत्र आणि १० हजार रुपये किमतीची चांदीची लक्ष्मीची मूर्ती, असा एकूण १ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.

ही चोरी २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ वाजल्यापासून १ सप्टेंबर रोजी पहाटे ३ वाजेपर्यंतच्या कालावधीत झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर मंचर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# पाबळ, खैरैनगर, धामारीतील ७४३ हेक्टर भूसंपादनाला स्थगिती

## वळसे पाटील, मेघना बोर्डीकरांसह ग्रामस्थांची मुख्यमंत्र्यांकडे धाव; ७/१२ वरील 'अधिसूचित क्षेत्र' नोंदीलाही ब्रेक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील पाबळ, खैरैनगर आणि धामारी येथील शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. तिन्ही गावांमधील तब्बल ७४३.५७५५ हेक्टर शेतजमीन औद्योगिक क्षेत्रासाठी संपादित करण्याच्या प्रस्तावित प्रक्रियेला तात्काळ स्थगिती देण्यात आली आहे. तसेच शेतजमिनींच्या ७/१२ उताऱ्यावर 'अधिसूचित क्षेत्र' अथवा भूसंपादनाचा शेरा नोंदविण्याच्या प्रक्रियेलाही स्थगिती देण्यात आली आहे.

या प्रश्नावर माजी गृहमंत्री तथा आमदार दिलीप वळसे पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री मेघना बोर्डीकर आणि पाबळ, खैरैनगर व धामारी येथील बाधित ग्रामस्थांच्या शिष्टमंडळासह मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी शेतकऱ्यांच्या अडचणी आणि जनभावना मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी प्रस्तावित भूसंपादन प्रक्रिया आणि ७/१२ वरील नोंदींना स्थगिती देण्यास सकारात्मक मान्यता दिली.

उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (चखृउ) पत्रानुसार पाबळ, खैरैनगर आणि धामारी या गावांतील एकूण ७४३.५७५५ हेक्टर क्षेत्रावर एमआयडीसी अधिनियम १९६१ अंतर्गत 'अधिसूचित क्षेत्र' असा शेरा ७/१२ उताऱ्याच्या इतर अधिकारात नोंदविण्याचे निर्देश देण्यात आले होते. यामध्ये ७११.५३९० हेक्टर खासगी आणि ३२.०३६५ हेक्टर सरकारी जमीन समाविष्ट होती.

मात्र, या प्रक्रियेमुळे स्थानिक शेतकऱ्यांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली होती. विशेषतः ७/१२ उताऱ्यावर 'अधिसूचित क्षेत्र' किंवा भूसंपादनाचा उल्लेख झाल्यास पीक कर्ज, मध्यम मुदतीचे कर्ज आणि इतर शेती कर्ज मिळण्यात अडथळे निर्माण होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली होती. जमीन हस्तांतरण अथवा गहाण ठेवण्यावरही परिणाम होण्याची शक्यता असल्याने शिक्षण, विवाह, वैद्यकीय उपचार यांसारख्या तातडीच्या खर्चासाठी आर्थिक व्यवस्था करण्याचा प्रश्न निर्माण झाला होता.

या भागातील अनेक शेतकरी अल्पभूधारक असून शेती हेच त्यांच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. त्यामुळे कोणताही अंतिम निर्णय घेण्यापूर्वी शेतकऱ्यांना विश्वासात घेणे आवश्यक असल्याची भूमिका ग्रामस्थांनी मांडली.



बैठकीत दिलीप वळसे पाटील यांनी शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान आणि निर्माण झालेली असुरक्षितता मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी या मागणीची तातडीने दखल घेत प्रस्तावित भूसंपादन प्रक्रियेला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला.

त्यानुसार पाबळ, खैरैनगर आणि धामारी येथील ७/१२ उतारे तसेच फेरफार पत्रकावर 'अधिसूचित क्षेत्र' किंवा भूसंपादनासंबंधी शेरा नोंदविण्याच्या कारवाईलाही तूर्त स्थगिती देण्यात आली आहे.

या निर्णयामुळे तीनही गावांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून ग्रामस्थांनी निर्णयाचे स्वागत केले आहे.

औद्योगिक विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनीबाबत कोणताही निर्णय घेताना स्थानिक शेतकरी, ग्रामस्थ आणि संबंधित प्रशासन यांच्यात पारदर्शक संवाद आवश्यक आहे, अशी अपेक्षाही या निमित्ताने व्यक्त होत आहे.

# आधुनिक कौशल्यांशिवाय आयटी क्षेत्रात टिकणे अशक्य : डॉ. दीपक शिकारपूर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात तरुणांसाठी मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध असून, स्टार्टअपच्या माध्यमातून स्वतःचा व्यवसाय उभारण्याचीही मोठी क्षमता या क्षेत्रात आहे. मात्र, बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेत सतत नवी कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. जुनं ते सोनं ही मानसिकता आयटी क्षेत्रात चालत नाही; 'नवं ते हवं' हीच काळाची गरज आहे. आधुनिक कौशल्यांशिवाय आयटी क्षेत्रात टिकता येणार नाही, असे मत ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर यांनी व्यक्त केले.

एनएमडी इन्फोटेक सर्व्हिसेसच्या नवव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी नवनाथ दरेकर, आमदार सत्यजित तांबे, श्रॉफ ग्रुप ऑफ कंपनीजचे व्यवस्थापकीय संचालक जे. पी. श्रॉफ, काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते गोपाळदादा तिवारी, राष्ट्रवादी काँग्रेसच्या रुपाली ठोंबरे-पाटील, अभिनेत्री ऋता दुर्गुळे, रितिका श्रोत्री आदी उपस्थित होते.

डॉ. शिकारपूर म्हणाले, डेटा सायन्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग यांसारखी आधुनिक तंत्रज्ञाने आत्मसात केली तरच सध्याच्या आयटी क्षेत्रात टिकून राहता येईल. अन्यथा काळाच्या ओघात तरुण मागे पडू शकतात. एनएमडी इन्फोटेकच्या माध्यमातून नवनाथ दरेकर तरुणांना आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण देत आहेत, ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, महाविद्यालयीन काळापासून माहिती तंत्रज्ञान क्षेत्राशी आपला संबंध असून, या क्षेत्राच्या गरजा आपल्याला माहीत आहेत. उद्योग, कॉर्पोरेट क्षेत्र आणि शिक्षणव्यवस्था यांच्यातील दरी भरून काढण्याचे काम एनएमडी संस्था करत आहे. रोजगारक्षम तरुण घडविण्यासोबतच स्टार्टअपच्या माध्यमातून उद्योजक निर्माण करण्यासाठी संस्थेचे योगदान महत्त्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले.

काँग्रेस नेते गोपाळदादा तिवारी यांनी तरुणांनी आपल्या हक्क आणि संधींबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागातून पुण्यासारख्या शहरात येऊन उद्योग आणि आयटी क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करण्यासह तरुणांमध्ये आत्मविश्वास आणि आत्मनिर्भरतेची भावना निर्माण करण्याचे काम नवनाथ दरेकर करत असल्याचे त्यांनी सांगितले.

जे. पी. श्रॉफ म्हणाले की, सायबर सिक्युरिटी आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रात तरुणांना संधी उपलब्ध करून देण्याचे काम एनएमडी इन्फोटेकच्या माध्यमातून होत आहे. ध्येय, ध्यास आणि ध्यान या त्रिसूत्रीचा संगम नवनाथ दरेकर आणि त्यांच्या कंपनीच्या कार्यात दिसतो, असे त्यांनी नमूद केले.

नवनाथ दरेकर म्हणाले की, एनएमडी इन्फोटेकच्या माध्यमातून आतापर्यंत १० हजार विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यात आले असून, सुमारे ५ हजार विद्यार्थ्यांना रोजगार आणि स्टार्टअप सुरू करण्याची संधी मिळाली आहे. विद्यार्थ्यांच्या पालकांना मिळणारे समाधान हेच संस्थेचे खरे यश असल्याचे त्यांनी सांगितले.

भविष्यात आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग आणि डेटा सायन्सच्या माध्यमातून समाजासाठी अधिक योगदान देण्यावर कंपनीचा भर राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# डिंभे-माणिकडोह बोगद्यावरून वळसे पाटील आक्रमक; 'मुख्यमंत्री न्याय देतील'चा विश्वास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

सातारा : प्रतिनिधी

डिंभे धरणातून जाणारा डावा कालवा पूर्ण क्षमतेने चालविला, तर डिंभे-माणिकडोह बोगद्याची गरजच भासणार नाही. या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन पत्र दिले असून, पुणे जिल्ह्यावर अन्याय होऊ देणार नाही, असा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. त्यामुळे नागरिक व कार्यकर्त्यांनी घाबरून न जाता मुख्यमंत्री यांच्या निर्णयाची प्रतीक्षा करावी, असे आवाहन माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले.

कुकडी प्रकल्पाच्या ५,७०४.५० कोटी रुपयांच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेत मूळ प्रकल्पात समाविष्ट नसलेल्या डिंभे-माणिकडोह बोगद्याचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे आंबेगावसह पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर एकलहरे येथे आयोजित पत्रकार परिषदेत वळसे पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.



डिंभे धरणातून बोगदा झाल्यास या परिसरातील शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होईल. आमचा कुणालाही पाणी देण्यास विरोध नाही; मात्र डिंभे धरणातून बोगदा करण्याला ठाम विरोध आहे. पाणी कुणाच्या मालकीचे नाही, असे वळसे पाटील यांनी स्पष्ट केले.

१८ जुलै २०२४ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत डिंभे-माणिकडोह बोगदा न करण्याबाबत आश्वासन मिळाले होते, असा दावाही त्यांनी केला.

धरणाचा डावा कालवा पूर्ण क्षमतेने चालविला, तर बोगद्याची गरजच राहणार नाही. शेतकऱ्यांच्या हितासाठी छातीवर दगड ठेवून मी पक्षप्रवेशाचा निर्णय घेतला. त्यावेळी इन्कम टॅक्स, ईडीची चौकशी किंवा भ्रष्टाचार हा मुद्दा नव्हता आणि आजही नाही. केवळ बोगदा होऊ नये, यासाठीच वेगळा निर्णय घेतला, असे वळसे पाटील म्हणाले.

या प्रश्नासंदर्भात मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांना पत्र दिले असून, प्रस्तावात दुरुस्ती करण्याचा शब्द त्यांनी दिला आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना केल्याचेही वळसे पाटील यांनी सांगितले.

बोगदा झाल्यास धरण अवघ्या तीन महिन्यांत रिकामे होऊन चार तालुक्यांवर मोठे जलसंकट निर्माण होऊ शकते, असा इशारा देत त्यांनी बोगद्याला कायमचा विरोध राहणार असल्याचे स्पष्ट केले. मात्र मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनामुळे कार्यकर्त्यांनी तातडीने आंदोलनाचा मार्ग स्वीकारू नये, असे आवाहन त्यांनी केले.

मुख्यमंत्री या प्रकरणात आपल्याला न्याय देतील, याचा पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे कार्यकर्ते आणि नागरिकांनी थोडा धीर धरावा, असे ते म्हणाले.

यावेळी म्हाडाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, माजी आमदार अतुल बेनके, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, सभापती कैलास बुवा काळे, निलेश स्वामी थोरात, जिल्हा परिषद सदस्य विष्णू हिंगे, प्रकाश घोलप आदी उपस्थित होते.

# वाळूंजनगर बागायत पट्ट्यात ओढे-नाले तुडुंब; तरीही दमदार पावसाची प्रतीक्षा



■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

वाळूंजनगर आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील वाळूंजनगर परिसरातील बागायत पट्ट्यातील ओढे-नाले पाण्याने तुडुंब भरले असले, तरी परिसरात अपेक्षित पाऊस झालेला नसल्याने शेतकऱ्यांची दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

गेल्या काही दिवसांत झालेल्या पावसामुळे ओढ्या-नाल्यांना पाणी आले असून, त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, खरीप हंगामातील पिकांच्या वाढीसाठी आणखी चांगल्या पावसाची गरज आहे. सध्या पावसाने दडी मारल्याने पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

बागायत क्षेत्रात विविध पिके घेतली जात असली, तरी पावसाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. ओढे-नाले भरले असले तरी जमिनीत पुरेसा ओलावा टिकून राहण्यासाठी सातत्याने पाऊस होणे आवश्यक असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

आकाशात ढगांची गर्दी होत असली, तरी अपेक्षित पाऊस पडत नसल्याने शेतकऱ्यांचे लक्ष आता पावसाकडे लागले आहे. येत्या काही दिवसांत परिसरात दमदार आणि समाधानकारक पाऊस पडावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# चांडोली बुद्रुकमध्ये नदीकाठ संरक्षण भिंतीच्या कामाची पाहणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

गणपती विसर्जन घाटासाठी पायऱ्यांच्या बांधकामाबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा मंचर : चांडोली बुद्रुक (ता. आंबेगाव) येथे नदीकाठच्या संरक्षण भिंतीच्या सुरू असलेल्या कामाची जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसेपाटील यांनी पाहणी केली. माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या माध्यमातून नदीकाठ संरक्षण भिंतीच्या बांधकामासाठी ७ कोटी रुपयांच्या विकासकामास मंजुरी मिळाली असून, प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे.

नदीकाठच्या परिसराचे संरक्षण करणे, पूरपरिस्थितीत होणारे नुकसान टाळणे तसेच ग्रामस्थांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हे काम महत्त्वपूर्ण मानले जात आहे. पाहणीदरम्यान विवेक वळसेपाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून कामाची सद्यस्थिती जाणून घेतली. तसेच कामाची गुणवत्ता, नियोजन आणि निर्धारित वेळेत काम पूर्ण करण्याबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

दरम्यान, ग्रामस्थांच्या मागणीनुसार गणपती विसर्जन घाटासाठी आवश्यक पायऱ्यांचे बांधकाम करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. विसर्जन घाटावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देताना ग्रामस्थांना सुरक्षित व सोयीस्कर व्यवस्था मिळावी, यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

नदीकाठ संरक्षण भिंतीचे काम आणि विसर्जन घाटाच्या सुविधांमुळे परिसरातील नागरिकांना आगामी काळात मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# टोळ्यांना वेसण घालण्यासाठी पुणे पोलीस आक्रमक; आंदेकर टोळीचा प्रतिस्पर्धी सूरज ठोंबरे टोळीवर 'मकोका'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

नाना पेठेतील बंडू आंदेकर टोळीचा प्रतिस्पर्धी सूरज ठोंबरे आणि साथीदारांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिले. आंदेकर टोळीचा म्होरक्या कृष्णा आंदेकर आणि त्याच्या साथीदारांवर न्यायालयाच्या आवारात ठोंबरे आणि साथीदार हल्ला करण्याच्या तयारीत असल्याचे उघडकीस आले. त्यानंतर या प्रकरणी ठोंबरे याच्यासह साथीदारांविरुद्ध भारती विद्यापीठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता.

सूरज अशोक ठोंबरे (वय २४, रा. नाना पेठ), वेदांत रोहित सावंत (वय २१ रा. धनकवडी), अथर्व दत्तात्रय खोपडे (वय २१ रा. गुजरवाडी, कात्रज, मूळ रा. नाझरे, भोर), धीरज लखारा (रा. धनकवडी) मानव शरद ढमाले (वय २४, रा. धनकवडी) अशी मकोका कारवाई केलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी आरोपी वेदांत, अथर्व आणि धीरज यांना अटक करण्यातआली आहे. सूरज ठोंबरे आणि मानव ढमाले हे फरार असून, त्यांचा शोध घेण्यात येत आहे. नाना पेठेतील वर्चस्वाच्या वादातून बंडू आंदेकर याचा मुलगा नगरसेवक वनराज आंदेकर याचा दोन वर्षांपूर्वी सोमनाथ गायकवाड टोळीने खून केला होता.

# प्रवीण भगवत यांना अनिरुद्ध देशपांडे यांच्या हस्ते 'वासुदेव जीवनदृष्टी गौरव पुरस्कार'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

पुणे : पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत १४ फीट फाउंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष प्रवीण भगवत यांना कै. विनायकराव निमदेव स्मृती 'वासुदेव जीवनदृष्टी गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. सिटी कॉर्पोरेशनचे एम.डी. अनिरुद्ध देशपांडे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

वेद वासुदेव प्रतिष्ठानच्या वतीने प. पू. श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित 'वासुदेव जन्मोत्सव सोहळा २०२६' भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. कर्वे रस्त्यावरील हर्षल हॉल येथे झालेल्या या सोहळ्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यावेळी वेद वासुदेव प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजित कृष्ण तुकदेव, अनिरुद्ध चिवटे, अविनाश कुळकर्णी, स्मिता घळसासी, नीलिमा चिवटे आदी मान्यवर उपस्थित होते.



सोहळ्याची सुरुवात सकाळी 'चैतन्य वासुदेव रथ सोहळ्या'ने झाली. त्यानंतर श्री दत्तात्रेय व श्री सत्यदत्त पूजा, महाप्रसाद, जन्मोत्सव कीर्तन, मनोगत, गायनसेवा आणि करुणाष्टपदी आदी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम झाले.

जन्मोत्सवानिमित्त हर्षल हॉल परिसरात दिवसभर भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.

## सारांश वृत्त

### 'मक्का करार' भारतासाठी का ठरतोय धोकादायक?; आखातापासून ढाकापर्यंत उभं राहतंय नवं संकट

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

पश्चिम आशियातील रणनीतीत सध्या मक्का कराराची सर्वाधिक चर्चा आहे. ७ ऑगस्टला सौदी अरेबिया, पाकिस्तान आणि तुर्कीने मक्का येथे संयुक्त सरक्षण करारावर स्वाक्षरी केली. ज्यात स्पष्ट शब्दात कुठल्याही एका देशावर सैन्य हल्ला झाल्यास तो तिन्ही देशांवरील हल्ला मानला जाईल असा उल्लेख आहे. सुरुवातीला या कराराला फक्त ३ इस्लामिक देशांमधील लष्करी आघाडी मानली गेली. परंतु मागील काही आठवड्यात ज्याप्रकारे या कराराच्या विस्ताराची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे भारताची चिंता वाढली आहे.

इतर आखाती देशांचे हितसंबंध, बांगलादेशसारख्या शेजारी देशांचा कल आणि आघाडीत सामील असलेल्या देशांची लष्करी ताकद हे तीन घटक मिळून भारतासमोर एक नवीन धोरणात्मक आव्हान उभे राहत आहे. मक्का करार औपचारिकपणे केवळ ३ देश सौदी अरेबिया, पाकिस्तान आणि तुर्की यांच्यात झाला आहे. परंतु या कराराच्या विस्तारावर काम सुरू असल्याचं तुर्कीने म्हटलं आहे. तज्ज्ञांनुसार, इजिप्त, कतार, कुवेत यासारखे देशही या करारात सहभागी होऊ शकतात. सौदी अरेबियाच्या नेतृत्वात हुथी हल्लेखोरांविरोधात मल्टीनॅशनल मॅरिटाईम डिफेन्स कोएलिशन बनले आहे. ज्यात कुवेत, बहरीन, कतार, जॉर्डन, इजिप्त आणि पाकिस्तान-तुर्कीसह १२ हून अधिक देश आधीच जोडले गेले आहेत. म्हणजेच कागदावर तीन देशांपुरती मर्यादित दिसणारी ही आघाडी प्रत्यक्षात आखाती आणि पश्चिम आशियाचा मोठा भाग आपल्यात सामावून घेण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

# 'एसआयआर' मतदारांची छाटणी की भाजपला निवडणूक जिंकवण्याची रणनीती? कपिल सिब्बलांचा गंभीर आरोप

## सर्वोच्च न्यायालयाने मोठ्या प्रमाणातील नावगळती थांबवावी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली/ वृत्तसंस्था

देशातील विविध राज्यांमध्ये सुरू असलेल्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रियेवरून राजकीय वातावरण तापले आहे. राज्यसभा खासदार आणि माजी केंद्रीय मंत्री कपिल सिब्बल यांनी बुधवारी निवडणूक आयोगाच्या या प्रक्रियेवर गंभीर आरोप केले. ही प्रक्रिया मतदार याद्या शुद्ध करण्यासाठी नसून भारतीय जनता पक्षाला निवडणुकीत विजय मिळवून देण्यासाठी राबवली जात असल्याचा आरोप सिब्बल यांनी केला. तसेच या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे वगळली जात असल्याचा दावा करत सर्वोच्च न्यायालयाने तातडीने हस्तक्षेप करून मोठ्या प्रमाणातील नावगळती थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली.

निवडणूक आयोगाच्या मते, विशेष सखोल पुनरीक्षणाचा उद्देश मतदार यादी अधिक अचूक करणे, मृत व्यक्तींची नावे हटवणे, कायमस्वरूपी स्थलांतरित झालेल्या मतदारांची नोंद तपासणे आणि दुबार नोंदी दूर करणे हा आहे. मात्र विरोधकांचा आक्षेप वेगळा आहे. जर पात्र आणि जिवंत मतदारांचीच नावे मोठ्या प्रमाणावर वगळली गेली, तर मतदार यादी दुरुस्तीच्या नावाखाली नागरिकांचा मतदानाचा घटनात्मक अधिकारच धोक्यात येऊ शकतो, असा त्यांचा दावा आहे.

या प्रक्रियेमुळे सर्वसामान्य मतदारांसमोर आता अत्यंत गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. आपले नाव मतदार यादीत आहे की नाही, हे प्रत्येक नागरिकाने पुन्हा तपासायचे का? नाव वगळले गेले असल्यास ते पुन्हा समाविष्ट करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे प्रत्येक नागरिकाकडे उपलब्ध आहेत का? आणि प्रशासनाच्या चुकीमुळे एखाद्या पात्र नागरिकाचे नाव वगळले गेले, तर त्याची जबाबदारी कोणाची?

याच पार्श्वभूमीवर सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयाने या प्रक्रियेकडे गांभीर्याने पाहण्याची मागणी केली आहे. विशेषतः मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या नावगळतीवर न्यायालयाने नियंत्रण ठेवावे, अशी त्यांची भूमिका आहे.

मात्र एक महत्त्वाची बाब स्पष्ट असणे गरजेचे आहे. विशेष सखोल पुनरीक्षणाचा उद्देश भारतीय जनता पक्षाला निवडणूक जिंकवणे हा आहे, हा कपिल सिब्बल यांचा आरोप आहे; तो न्यायालयाने सिद्ध केलेला निष्कर्ष नाही. त्यामुळे आरोप आणि सिद्ध तथ्य यांच्यातील फरक लक्षात घेणे आवश्यक आहे.

पण प्रश्न तेवढ्यावर थांबत नाही. मतदार यादीतून एखाद्या पात्र नागरिकाचे नावच गायब झाले, तर त्याचा मतदानाचा अधिकार कागदावर शाबूत असूनही प्रत्यक्षात तो निष्प्रभ होऊ शकतो. त्यामुळे नावगळतीची प्रक्रिया पारदर्शक, तपासता येण्याजोगी आणि नागरिकांना पुरेशी दुरुस्तीची संधी देणारी असणे अत्यावश्यक आहे.

निवडणूक ही केवळ मतदानाची प्रक्रिया नाही; ती लोकशाहीच्या विश्वासाची कसोटी आहे. मतदारच यादीत नसेल, तर लोकशाहीचा निर्णय कोण घेणार? आता या प्रश्नावर निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

## दिशा सालियन प्रकरण सीबीआयकडे; न्यायालयाचा आदेश की राजकीय कथानकाला नवा श्वास?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई / प्रतिनिधी

दिशा सालियन मृत्यू प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्याचा मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश महत्त्वाचा आहे. मात्र या आदेशानंतर एक मूलभूत प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहेन्यायालयाने राजकीय वादाच्या केंद्रस्थानी असलेल्या प्रकरणांची दखल घेताना राजकीय कथानकांना अनवधानाने बळ मिळण्याची शक्यता किती गांभीर्याने तपासली पाहिजे?

दिशाच्या मृत्यूबाबत याचिकाकर्त्यांच्या बाजूने गंभीर संशय व्यक्त करण्यात आला आहे. दुसरीकडे सरकारी वकिलांनी हत्येचा कोणताही ठोस पुरावा नसल्याचे सांगितले असून, आत्महत्या किंवा अपघाताची शक्यता व्यक्त केली आहे. संबंधित राजकीय नेत्यांच्या वतीने ही याचिका राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा युक्तिवादही करण्यात आला. म्हणजेच न्यायालयासमोरच तीन वेगवेगळे दावे आहेत.

अशा परिस्थितीत सीबीआय तपासाचा आदेश म्हणजे कोणत्याही आरोपाला न्यायालयाने मान्यता दिली, असा अर्थ काढता येणार नाही. न्यायालयाने पुराव्याच्या आधारेच कारवाई होईल, ज्यांच्याविरुद्ध पुरावे नाहीत त्यांना निष्कारण आरोपी केले जाणार नाही, हे स्पष्ट केले आहे. ही बाब महत्त्वाची आहे.

पण प्रश्न तरीही उरतो राजकीयदृष्ट्या संवेदनशील प्रत्येक प्रकरणात न्यायालयीन हस्तक्षेपाची मागणी होत राहिली, तर न्यायव्यवस्थेचा वापर राजकीय संशयांना वैधता देण्यासाठी होऊ नये याची खबरदारी कोण घेणार?

सीबीआयकडे तपास गेल्याने आता सत्य अधिक स्पष्टपणे समोर येण्याची अपेक्षा आहे. मात्र तपास सुरू होण्यापूर्वीच आरोपांना निष्कर्षाचे स्वरूप देणे धोकादायक ठरू शकते.

## शेतीचे मॅपिंग होणार, डेटा तयार होणार; पण शेतकऱ्यांच्या बांधावर योजना पोहोचणार कधी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई / प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी शेतीचे मॅपिंग करून अद्ययावत डेटा तयार करण्याचे निर्देश कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी दिले. जमीन, माती, पाणी आणि पिकांची अचूक माहिती उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांना योग्य पिकांची निवड, निर्यातक्षम उत्पादन आणि अधिक उत्पन्नासाठी मार्गदर्शन करण्याचा सरकारचा प्रयत्न स्वागतार्ह आहे. पण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसमोरचा खरा प्रश्न वेगळाच आहेनवीन आदेश कागदावर तयार होणार की त्याचा प्रत्यक्ष फायदा शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचणार?

कृषी विभागाच्या बैठका, आढावा आणि निर्देशांची कमतरता महाराष्ट्रात नाही. प्रत्येक बैठकीनंतर नवे आदेश, नवी उद्दिष्टे आणि नवे आराखडे जाहीर होतात. मात्र प्रत्यक्ष शेतात पोहोचल्यावर शेतकऱ्याला अजूनही माती परीक्षण, पाण्याचे नियोजन, बाजारभाव, पीक निवड, निर्यात आणि सरकारी योजनांचा लाभ मिळवण्यासाठी अनेक कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. मग अद्ययावत डेटा तयार झाला तरी तो शेतकऱ्याच्या मोबाईलवर आणि बांधावर पोहोचणार कसा?

शेतीचे मॅपिंग झाले, तर कोणत्या जमिनीत कोणते पीक योग्य आहे, पाण्याची उपलब्धता किती आहे आणि उत्पादन क्षमता किती आहे, याची माहिती मिळू शकते. पण या डेटाचा उपयोग केवळ सरकारी फाइल्स आणि अहवाल तयार करण्यापुरता झाला, तर त्याचा उपयोग काय?

निर्यातक्षम पिकांसाठी मार्गदर्शन करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. मात्र उत्पादन वाढले आणि बाजारभाव कोसळला तर शेतकऱ्याचे उत्पन्न वाढणार कसे? प्रक्रिया उद्योग, साठवणूक, वाहतूक आणि हमीभावाची व्यवस्था नसेल तर केवळ 'निर्यातक्षम शेती'चा सल्ला कितपत उपयोगी ठरेल?

शेतकऱ्यांच्या यशोगाथा तयार करण्याच्या सूचना चांगल्या आहेत; पण यशोगाथा सांगण्यापेक्षा त्या यशामागची यंत्रणा प्रत्येक शेतकऱ्याला उपलब्ध करून देणे अधिक गरजेचे नाही का?

सरकारने आता आदेश देण्यापेक्षा अंमलबजावणीची वेळमर्यादा, जिल्हानिहाय लक्ष्य आणि शेतकऱ्यांना मिळालेल्या प्रत्यक्ष लाभाचा सार्वजनिक अहवाल जाहीर करायला हवा. कारण शेतकऱ्याला आणखी एक सरकारी आदेश नको; त्याला त्याच्या शेतात बदल दिसायला हवा.

## 'मुली ५३ टक्के, पण नेतृत्व कुठे?' दिल्ली विद्यापीठाच्या विद्यार्थी निवडणुकीत महिलांना ५० टक्के आरक्षणाची मागणी; उच्च न्यायालयाने विचारला थेट कायदेशीर आधार

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

दिल्ली विद्यापीठाच्या विद्यार्थी राजकारणात महिलांच्या प्रतिनिधित्वाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. दिल्ली विद्यापीठ विद्यार्थी संघ आणि संलग्न महाविद्यालयांच्या विद्यार्थी संघांच्या निवडणुकांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण लागू करावे, या मागणीसाठी दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयाने बुधवारी केंद्र सरकार, शिक्षण मंत्रालय, विद्यापीठ अनुदान आयोग आणि दिल्ली विद्यापीठाला नोटीस बजावली. मुख्य न्यायाधीश डी. के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस करिया यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली.

या याचिकेत वकिल शबाना हुसेन यांनी दावा केला आहे की दिल्ली विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये महिलांचे प्रमाण सुमारे ५३ टक्के असतानाही निवडून येणाऱ्या विद्यार्थी प्रतिनिधींमध्ये त्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. २०१३ ते २०२४ या कालावधीत निवडून आलेल्या ३२ विद्यार्थी प्रतिनिधींमध्ये केवळ ८ महिला होत्या. त्याहून धक्कादायक बाब म्हणजे २००९ नंतर दिल्ली विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या अध्यक्षपदी एकही महिला निवडून आलेली नाही. १९५४ पासून आतापर्यंतच्या ६८ अध्यक्षांमध्ये केवळ १० महिला झाल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे.

याचिकाकर्त्यांचा आरोप आहे की विद्यार्थी निवडणुकांमध्ये पैशांचा आणि बळाचा वापर, हिंसाचार, धमकावणे, लैंगिक टिप्पणी, समाजमाध्यमांवरील छळ आणि ट्रोलिंग यामुळे महिला विद्यार्थिनी निवडणुकीच्या मैदानापासून दूर राहतात. परिणामी महिलांच्या सुरक्षिततेपासून वसतिगृह, स्वच्छतागृहे, लैंगिक छळ आणि इतर महिलाविषयक प्रश्नांना विद्यार्थी राजकारणात पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नाही.

मात्र न्यायालयाने याचिकेतील मागणीवर एक अत्यंत महत्त्वाचा कायदेशीर प्रश्न उपस्थित केला. ५० टक्के आरक्षणाचा अधिकार नेमका कोणत्या कायद्यातून निर्माण होतो? असा सवाल खंडपीठाने केला. कोणत्याही कायद्यात किंवा दिल्ली विद्यापीठाच्या नियमांमध्ये असा अधिकार स्पष्टपणे दिलेला नसेल, तर न्यायालय स्वतःहून नवीन अधिकार निर्माण करू शकते का, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला. न्यायालयाने स्पष्ट केले की न्यायालयाचा आदेश अस्तित्वात असलेल्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी असतो; नवीन अधिकार निर्माण करण्यासाठी नव्हे.

महत्त्वाचे म्हणजे हा प्रश्न अचानक निर्माण झालेला नाही. सप्टेंबर २०२४ मध्येही दिल्ली उच्च न्यायालयाने दिल्ली विद्यापीठाच्या कुलगुरूंना महिलांसाठी ५० टक्के आरक्षणाच्या मागणीवरील निवेदनावर निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. मात्र याचिकाकर्त्यांच्या म्हणण्यानुसार अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

## टोलच्या पैशांवर डल्ला? राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या टोल वसुलीतील कथित गैरव्यवहारावर अंमलबजावणी संचालनालयाची धडक; ७ राज्यांतील १४ ठिकाणी छापे!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

देशातील राष्ट्रीय महामार्गांवर वाहनचालकांकडून वसूल होणाऱ्या टोलच्या पैशांमध्ये कथित गैरव्यवहार झाल्याच्या प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले आहे. अंमलबजावणी संचालनालयाने बुधवारी, २ सप्टेंबर २०२६ रोजी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या विविध टोल नाक्यांवरील कथित बनावट टोल वसुली आणि आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणात सात राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकाच वेळी सुमारे १४ ठिकाणी छापेमारी केली. ही कारवाई उत्तर प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र, जम्मू-काश्मीर, मध्य प्रदेश, दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्र आणि पश्चिम बंगाल येथे करण्यात आली.

या प्रकरणामागील आरोप आणखी गंभीर आहेत. तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, काही टोल नाक्यांवर अधिकृत यंत्रणेऐवजी अनधिकृत संगणकीय प्रणालीचा वापर करून टोल पावत्या तयार केल्या जात असल्याचा आरोप आहे. वाहनचालकांकडून प्रत्यक्ष पैसे घेतले जात होते; मात्र त्या व्यवहारांची नोंद राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकृत आर्थिक व्यवस्थेत होत नसल्याचा संशय आहे. अशा प्रकारे वसूल झालेला पैसा अधिकृत हिशेबाबाहेर वळवला गेल्याचा तपास यंत्रणांचा आरोप आहे.

या प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने पैशांचा नेमका प्रवाह कुठे गेला, या कथित गैरव्यवहारातून कोणाला आर्थिक फायदा झाला आणि त्यामागे कोणते व्यक्ती अथवा संस्थात्मक जाळे कार्यरत होते, याचा तपास सुरू केला आहे. दोन पोलिस गुन्ह्यांच्या आधारे आणि धनशोधन प्रतिबंधक कायद्यांतर्गत या तपासाला सुरुवात करण्यात आली आहे. अधिकृत नोंदी आणि न्यायवैद्यक तपासणीमध्ये अनधिकृत संगणकीय प्रणालीच्या वापराबाबत पुरावे मिळाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

इथे सर्वात मोठा प्रश्न राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या देखरेख व्यवस्थेवर उपस्थित होतो. टोल नाक्यांवर दररोज हजारो वाहनांकडून कोट्यवधी रुपयांची वसुली होत असताना, अधिकृत नोंदीबाहेर व्यवहार करण्यासाठी अनधिकृत संगणकीय प्रणाली वापरली गेली असेल,

तर हा प्रकार इतका काळ संबंधित यंत्रणांच्या लक्षात कसा आला नाही? टोल वसुलीची तपासणी, संगणकीय नोंदींचे परीक्षण आणि आर्थिक लेखापरीक्षण नेमके किती प्रभावी आहे, हा प्रश्न आता अनिवार्यपणे विचारला जाणार आहे.

मात्र या छाप्यांनंतरच कोणाला दोषी ठरवणे योग्य ठरणार नाही. अंमलबजावणी संचालनालयाचा तपास सुरू आहे आणि आरोप अद्याप तपासाच्या टप्प्यावर आहेत. पुढील तपासातून कथित गैरव्यवहाराचे खरे स्वरूप, आर्थिक नुकसान आणि जबाबदार व्यक्ती स्पष्ट होतील.

तरीही सार्वजनिक पैशांशी संबंधित हा प्रकार असेल तर प्रश्न अत्यंत गंभीर आहेसामान्य नागरिकाने भरलेला टोल सरकारी खात्यात जाण्याऐवजी कुणाच्या खिशात गेला असेल, तर त्याचा हिशेब कोण देणार?

राष्ट्रीय महामार्गांवर पारदर्शकता आणि डिजिटल व्यवस्थेचे दावे केले जात असताना अधिकृत नोंदीबाहेर टोल वसुली झाल्याचा संशय निर्माण होणे ही यंत्रणेसाठी मोठी धोक्याची घंटा आहे.

## 'भ्रष्टाचारमुक्त भारत'च्या दाव्यांचा फुगा फुटला? २०२५ मध्ये सरकारी विभागांविरोधात तब्बल ७०,५८४ तक्रारी; बँका आणि रेल्वे अव्वल!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

केंद्र सरकारकडून भ्रष्टाचाराविरोधात कठोर भूमिका घेतल्याचे दावे वारंवार केले जातात. मात्र आता केंद्रीय दक्षता आयोगाच्या अहवालातील आकडे सरकारच्या या दाव्यांसमोर मोठा प्रश्नचिन्ह उभे करत आहेत. २०२५ या एकाच वर्षात सरकारी विभाग आणि सार्वजनिक संस्थांविरोधात भ्रष्टाचाराच्या तब्बल ७०,५८४ तक्रारी दाखल झाल्या. यापैकी ६४,९०५ तक्रारींचा ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत निपटारा झाल्याचे अहवालात नमूद आहे. म्हणजेच सरकारी यंत्रणेविरोधात भ्रष्टाचाराच्या तक्रारींचा हा आकडा काही किरकोळ प्रकार नसून प्रशासनातील गंभीर अस्वस्थतेचे चित्र दाखवणारा आहे.

विशेष म्हणजे या यादीत बँका आणि भारतीय रेल्वे आघाडीवर आहेत. नागरिकांचा पैसा, सार्वजनिक सेवा आणि सरकारी व्यवस्थेशी थेट संबंध असलेल्या या दोन क्षेत्रांविरोधात मोठ्या प्रमाणावर तक्रारी येणे ही सरकारसाठी निश्चितच चिंतेची बाब आहे. केंद्रीय दक्षता आयोगाच्या माहितीनुसार, मुख्य दक्षता अधिकाऱ्यांकडे आलेल्या या तक्रारींची छाननी आणि निपटारा करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांवर असते.

पण इथेच सरकारसमोर खरा प्रश्न उभा राहतो तक्रारींचा निपटारा झाला म्हणजे भ्रष्टाचार संपला का? ७०,५८४ तक्रारींपैकी ६४,९०५ तक्रारी निकाली काढल्या गेल्या, हा आकडा प्रशासनाच्या कार्यक्षमतेचा पुरावा म्हणून मांडला जाऊ शकतो. पण किती तक्रारींमध्ये भ्रष्टाचार सिद्ध झाला? किती प्रकरणांत दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई झाली? किती जणांना निलंबित केले? किती जणांवर फौजदारी गुन्हे दाखल झाले? आणि किती प्रकरणे केवळ कागदोपत्री बंद करण्यात आली? या प्रश्नांची उत्तरेच भ्रष्टाचारविरोधी कारवाईची खरी परिणामकारकता सांगतील.

सरकारच्या भ्रष्टाचारमुक्त भारताच्या घोषणांकडे पाहिले तर चित्र वेगळे दिसते. भ्रष्टाचाराविरुद्ध शून्य सहनशीलतेची भाषा केली जाते; परंतु सरकारी संस्थांविरोधातच वर्षभरात सत्तर हजारांहून अधिक तक्रारी येत असतील, तर व्यवस्थेतील छिद्रे नेमकी कुठे आहेत, याचा गंभीर आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तक्रारदार आणि माहिती देणाऱ्या नागरिकांचे संरक्षण. भ्रष्टाचाराविरोधात तक्रार करणाऱ्या व्यक्तीला जर प्रशासनाकडूनच त्रास होण्याची भीती असेल, तर सामान्य नागरिक पुढे येणार कसा? केंद्रीय दक्षता आयोगाच्या व्यवस्थेत भ्रष्टाचार किंवा पदाचा गैरवापर याबाबत तक्रारी स्वीकारण्याची आणि तक्रारदाराची ओळख संरक्षित ठेवण्याची तरतूद आहे.

म्हणूनच आता केवळ 'भ्रष्टाचाराविरोधात कठोर कारवाई सुरू आहे' असे सांगून भागणार नाही. सरकारने सार्वजनिकपणे सांगितले पाहिजे२०२५ मधील ७०,५८४ तक्रारींपैकी किती तक्रारी खऱ्या ठरल्या, किती अधिकाऱ्यांवर कारवाई झाली आणि भ्रष्टाचारामुळे सरकारच्या तिजोरीला किती नुकसान झाले? कारण तक्रारींची संख्या कमी करण्यापेक्षा भ्रष्टाचाराची मुळे तोडणे महत्त्वाचे आहे. अन्यथा 'भ्रष्टाचारमुक्त भारत' ही घोषणा फक्त भाषणांमध्ये राहील आणि सरकारी कार्यालयांच्या फाइलांमध्ये भ्रष्टाचाराच्या तक्रारींचे आकडे वाढतच राहतील. आकडे आता सरकारसमोर आहेत; प्रश्न एवढाचसरकार या आकड्यांना आरसा मानणार की पुन्हा घोषणांच्या पडद्यामागे लपणार?